ह ल न - २
दस्त ९६०५ /२०२१
२३/३८

हस्तांतरण करू नये असा कोणत्याही कोर्टाचा मनाई हुकूम नाही. अगर कोणत्याही कोर्टाने अगर शासकीय हुकूमाने अव्वल अगर अंतीम जप्ती झालेली नाही.

अशी खात्री आम्ही आपणास देतो. असे काहीही निघाल्यास त्याचे संपूर्ण निरसन करण्याची जबाबदारी लिहून देणार यांचीच राहील.

८) **इजमेंट :-**

इजमेंटच्या ॲक्टच्या तरतुदीअन्वये सदर मिळकतीवर कोणत्याही इजमेंटचा, वहिवाटीचा, ग्रँटचा, अगर इतर तत्सम बोजा नाही. अशी खात्री आम्ही आपणास देतो.

९) **महत्वाची अटी :-**

१) सदर भूविकास करारनाम्या मधील मिळकतीची लिहून घेणार यांनी संबंधित कार्यालयांकडून बांधकाम परवानगी घ्यावयाची आहे व रेरा मध्ये नोंदणी करावयाची असल्यास सदर इमारतीचे नांव **"सह्याद्री शिखर"** असे राहील. त्यासाठी लागणारा संपूर्ण खर्च हा लिहून घेणार यांनी करावयाचा असून त्याची कोणतीही तोषीस लिहून देणार यांना लागू देणार नाही.

२) सदर भूविकास करारनाम्या मधील मिळकतीवर टी.डी.आर. लिहून घेणार यांनी त्यांचे स्व:खर्चाने विकत घेवून लोड करून द्यावयाचे आहे. त्यासाठी लागणारा संपूर्ण खर्च हा लिहून घेणार यांनी करावयाचा असून त्याची कोणतीही तोषीस लिहून देणार यांना लागू देणार नाही.

३) सदर मिळकतीत विकसीत झालेल्या एकूण बांधकामापैकी मोबदल्याच्या तपशिलात नमुद केल्याप्रमाणे मिळकत लिहून देणार यांनी ठेवावयाची असून उर्वरीत मिळकत लिहून घेणार यांनी ठेवावयाचे आहे व राहील.

ज ल न - ३
दस्त क्र. /२०२१
२४/३४

लिहून घेणार यांनी ठेवावयाची

मिळकतीचा तपशिल खालीलप्रमाणे

| अ.नं. | मजला | युनिट नंबर | बांधीव क्षेत्र |
|---|---|---|---|
| ०१. | बेसमेंट | रहिवाशी स्टोअर नंबर १ | २७.१९० |
| ०२. | बेसमेंट | रहिवाशी स्टोअर नंबर २ | २७.१९० |
| ०३. | तळ मजला | दुकान नंबर १ | ३४.०० |
| ०४. | तळ मजला | दुकान नंबर २ | ३४.०० |
| ०५. | पहिला मजला | फ्लॅट नंबर १०३ | ७१.१२० |
| ०६. | दुसरा मजला | फ्लॅट नंबर २०३ | ७१.१२० |
| ०७. | तिसरा मजला | फ्लॅट नंबर ३०१ | ६७.५० |
| ०८. | तिसरा मजला | फ्लॅट नंबर ३०२ | ६७.५८ |
| ०९. | तिसरा मजला | फ्लॅट नंबर ३०३ | ७१.१२० |
| १०. | चौथा मजला | फ्लॅट नंबर ४०१ | ६७.५० |
| ११. | चौथा मजला | फ्लॅट नंबर ४०२ | ६७.५८ |
| १२. | चौथा मजला | फ्लॅट नंबर ४०३ | ७१.१२० |
| १३. | पाचवा मजला | फ्लॅट नंबर ५०१ | ६७.५० |
| १४. | पाचवा मजला | फ्लॅट नंबर ५०२ | ६७.५८ |
| १५. | पाचवा मजला | फ्लॅट नंबर ५०३ | ७१.१२० |
| १६. | सहावा मजला | फ्लॅट नंबर ६०१ | ६७.५० |
| १७. | सहावा मजला | फ्लॅट नंबर ६०२ | ६७.५८ |
| १८. | सहावा मजला | फ्लॅट नंबर ६०३ | ७१.१२० |
| १९. | सातवा मजला | फ्लॅट नंबर ७०१ | १२३.६२ |
| २०. | सातवा मजला | फ्लॅट नंबर ७०२ | ६२.०३ |
| | | | **१२७५.०७** |

४) सदर मिळकतीवर भविष्यात जर जास्तीचा एफ.एस.आय., प्रिमियम, टी.डी.आर मिळाला व त्याचा वापर करावयाचा असे लिहून घेणार व लिहून देणार यांनी ठरविले तर तो हा लिहून घेणार व लिहून देणार यांचा निम्मा निम्मा मालकीचा रहावयाचा आहे व राहील. सदर एफ.एस.आय., प्रिमियम, टी.डी.आर. हा

ज ल न - २
दस्त ८०५७ /२०१९
७१/३८

बांधकामासहीत जमिन मालकांना विकासकांना देणे बंधनकारक राहील. परंतु त्यासाठी नव्याने वाढीव क्षेत्राबाबत नवीन करारनामा लिहून नोंदविला जाईल.

५) सदर मिळकतीवर लिहून घेणार यांनी बांधकाम परवानगी मिळाल्यानंतर पुढील २ वर्षा पर्यंत बांधकाम पूर्ण करावयाचे आहे व राहील.

६) सदरचे डेव्हलपमेंट करारानुसार सदर प्लॉट मिळकतीवर नियोजीत बांधल्या जाणाऱ्या इमारतीबाबचा नकाशा तसेच आर.सी.सी. डिझाईन यासाठी आर्कीटेक्टची नेमणूक लिहून घेणार यांनी करावयाची आहे. तसेच सदरचा नकाशा मंजूर झाल्यानंतर त्याप्रमाणे नियोजीत इमारतीचे बांधकाम करण्याचा संपूर्ण हक्क व अधिकार आम्ही लिहून देणार यांनी तुम्ही लिहुन घेणार यांना या कराराने दिलेला आहे. तसेच लिहुन घेणार यांना त्यांच्या हिश्यास आलेल्या मिळकतीमध्ये नियमाप्रमाणे सदर नकाशामध्ये फेरबदल करुन रिव्हाईज्ड नकाशे मंजुर करुन घेणे, त्याबाबतच्या परवानग्या घेणे, त्या प्रमाणे बांधकाम पूर्ण झाल्यावर कंप्लीशन नकाशे तयार करणे, महानगरपालिका जळगांव यांचे कडून कमेन्समेंट/कंप्लीशन / भोगवटा सर्टीफीकेट घेणे याचा सुध्दा हक्क व अधिकार आम्ही तुम्हास या करारनाम्यान्वये दिलेला आहे.

७) सदर प्लॉट मिळकतीवर डेव्हलपमेंट तुम्ही तुमचे संपूर्ण खर्चाने करावयाचे आहे त्यासाठी आर्कीटेक्ट नेमणे, कॉन्ट्रॅक्टर नेमणे, मजुर कारागीर नेमणे व बांधकामासाठी लागणारे संपूर्ण मटेरीयल तुम्ही तुमचे नावाने खरेदी करणे व नेमलेले सर्व कॉन्ट्रॅक्टर, मजुर, ठेकेदार वगैरे यांना पेमेंट देणे.

८) सदर मिळकतीवरील बांधकाम पुर्ण करण्यासाठी व त्याअनुषंगीक कामे कृत्य व बाबी करणेसाठी तुम्ही विविध कार्यासाठी ठेकेदार नेमून कामाचा ठेका देवून ती कामे तुम्ही लिहून घेणार यांनी स्वत: स्वखर्चाने करावयाची आहे.

जलन - २
दस्त ६०६०/२०२१
२८/३८

९) सदर विकासकामाच्या प्रसिध्दीसाठी सदर मिळकतीवर योग्य त्या ठिकाणी जाहीरात फलक बसविण्याचा विकासकाला हक्क व अधिकार आहे.

१०) सदरची मिळकत जमीनीशी संबंधीत कधीही कोणताही वाद असल्यास वा उद्‌भवल्यास लिहून देणार यांनी त्याचे निरसन करावयाचे आहे व राहील. तसेच बांधकामासंबंधी कोणाताही वाद उपस्थित झाला तर त्याचे निरसन विकासक यांनी करावयाचे आहे. बांधकामाबाबत वाद उपस्थित झाल्यास विकसक यांनी न्यायालयामध्ये मालक त्यांच्या वतीने हजर रहावयाचे आहे व कोर्ट कचेरीविषयक आवश्यक ती सर्व काम करावयाची आहेत व त्यासाठी लिहून देणार हे लिहून घेणार यांना सर्वतोपरी मदत करतील.

११) सदर मिळकतीवर डेव्हलपमेंटकामी तात्पुरते शेड बांधणे, नळ कनेक्शन घेणे, इले.मिटर कनेक्शन घेणे, बोअरवेल करणे वगैरे अधिकार तुम्हांस या कराराने राहतील. मात्र सदर बाबतचे येणारे बिले तुम्ही लिहून घेणार यांनी भरावयाची आहे.

१२) सदर मिळकतीत एक विहीर असून सदर विहीरीतून बांधकाम पुर्ण झाल्यानंतर सुध्दा लिहून घेणार यांना पाणी घेण्याचा व घेऊन जाण्याचा हक्क व अधिकार आहे व राहील.

१३) सदरची मिळकतीचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर तयार झालेल्या बांधकामापैकी - कलम ९.३ मध्ये नमुदप्रमाणे बांधकाम क्षेत्र हे लिहून घेणार विकासक यांचे मालकीचे रहावयाचे आहे.

तसेच वर नमुद केल्याप्रमाणे विकासक यांना मिळणारे बांधकाम क्षेत्र हे एक किंवा अनेक व्यक्तीस विकण्याचा अधिकार विकासक यांना आहे व राहील. त्या दृष्टीने त्रयस्थ इसमाशी बोलणे करुन सौदेपावती, खरेदीखत, बक्षीस, भाडेपट्टा करारनामा, लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनामा, गहाणखत, रिकन्व्हेंन्स डीड (बोजा कमी करण्याचा लेख) इत्यादी दस्त नोंदणी अधिनियमातील संपुर्ण दस्तऐवज म. सह दुय्यम निबंधक वर्ग-२ सो. जळगावं यांच्या कार्यालयामध्ये नोंदविणेचा, हजर करण्याचा व भरणा स्विकारण्याचा व कबुली जबाब देण्याचा

जलन - २
दस्त क्र. ८०८४/२०२१
१०/३८

अधिकार तसेच बयाणा रक्कम रोख/चेक/ डी.डी. व्दारे तसेच इत्यादी प्रकारे स्विकारण्याचा विकासक यांना अधिकार आहे व राहील. तसे मुखत्यारपत्र लिहून देणार हे लिहून घेणार यांना या भूविकास करारनाम्याच्या अनुषंगाने लिहून नोंदवून देत आहे.

१४) सदर मिळकतीबाबत सदर भूविकास करारनाम्यास अनूसरून, जनरल मुखत्यारपत्र सुध्दा लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना लिहून नोंदवून देणार आहे. तसेच सदर मिळकतीवर बांधकाम परवानगी मिळाल्यावर व त्याबाबत घोषणापत्र नोंदणी झाल्यावर सदर भु-विकास करारनाम्यास अनुसरुन पुन्हा जनरल मुखत्यार पत्र लिहून देणार हे लिहून घेणार यांना लिहून नोंदवून देणार आहे.

१५) सदर प्लॉट मिळकतीवर बांधकाम झाल्यानंतर भविष्यात नैसर्गीक आपत्तीमुळे इमारत जमीनदोस्त झाल्यास नव्याने तयार होणाऱ्या इमारतीस लिहून घेणार व लिहून देणार किंवा त्यांनी विकले असल्यास नवीन मालक यांचा वर नमुद प्रमाणेच हिस्सा रहावयाचा आहे व राहील. परंतु सदर मिळकतीचा संपुर्ण खर्च हा ज्याने त्याने आपआपल्या हिस्सेराशीप्रमाणे करावयाचा आहे व राहील.

१६) या करारनाम्याच्या अंतर्गत उद्देशित उद्दिष्टांची पूर्ती होईपावेतो सदर करारनामा अस्तित्वात राहील व रद्द होणार नाही.

येणेप्रमाणे भु-विकास करारनामा आम्ही आमचे स्वराजीखुशीने व स्वसंतोषाने खालील साक्षीदारांसमक्ष लिहून दिला असून तो आमचेवर व आमचे वंशवारस, भाऊबंद तसेच इष्टेटवारस यांचेवर पुर्णपणे बंधनकारक आहे व राहील.



सि. बा. तायडे

**श्री. सिताराम बाबुराव तायडे**

**लिहून देणार नंबर १**

जलन - २



श्री.बाबुलाल लक्ष्मण राजपूत

लिहून देणार नंबर २



नथु लक्ष्मण पाटील

श्री.नथू लक्ष्मण पाटील

लिहून देणार नंबर ३



श्री.सिताराम लक्ष्मण राजपूत

लिंहून देणार नंबर ४



लताबाई आसाराम महाजन

लताबाई आसाराम महाजन

लिहून देणार नंबर ५

जलन - २

दस्त क्र. ६६०४ / २०२१

१०/३८



श्री. मनोज आसाराम महाजन

लिहून देणार नंबर ६



श्री.किशोर आसाराम महाजन

लिहून देणार नंबर ७

सौ मनिषा मुकेश मोरे



मनिषा मुकेश मोरे

लिहून देणार नंबर ८

जा ऌ नं - २
क्र. COEDY/२०२१
२०/३४



सह्याद्री शिखर तर्फे भागीदार
श्री. परशुराम एकनाथ पाटील
लिहून घेणार नंबर १



सह्याद्री शिखर तर्फे भागीदार
सौ. श्रद्धा हरिष सुर्वे
लिहून घेणार नंबर २

: साक्षीदार :

१. हर्षल परशुराम वाघ
पोस्टल कॉलनी, जळगाव

२. प्रितेश दिलीप शिंपी
रामानंद नगर जळगाव

दस्त क्र. २
0६०४ / २१
२९/३८

## -: प्रतिज्ञापत्र :-

सदरचा दस्तऐवज हा भारतीय महाराष्ट्र नोंदणी कायदा १९०८ व त्या अंतर्गत असलेल्या नियमातील तरतुदीनुसारच नोंदणीस दाखल केलेला आहे. सदर दस्तातील संपुर्ण मजकुर, निष्पादक व्यक्ती, साक्षीदार, ओळखदार व दस्तासोबत जोडलेल्या कागदपत्रांची सत्यता दोन्ही पक्षकारांनी तपासली आहे. दस्ताची सत्यता / वैधता कायदेशीर बाबींसाठी दस्त निष्पादक व कबुलीधारक हे स्वत: जबाबदार राहतील. दस्तऐवजासोबत जोडलेले कागदपत्र, घेणार, देणार, कुलमुखत्यार धारक, ओळखदार व्यक्ती इत्यादी बनावट आढळून आल्यास त्याची जबाबदारी निष्पादकांची राहील.

महाराष्ट्र नोंदणी नियम १९६१ मधील नियम ४४ नुसार सदर दस्तऐवजाची वैधता तपासण्याची जबाबदारी नोंदणी अधिकाऱ्यांची नाही. मालमत्ता हस्तांतरण कायदा १८८२ चे कलम ५५ नुसार दस्तातील नमुद मिळकतीचे टायटल (हक्क) तपासणीची जबाबदारी दोन्ही पक्षकार म्हणजे लिहून देणार व लिहून घेणार यांची आहे. याची जाणीव दस्तातील दोन्ही पक्षकारांना आहे.

दस्तात नमुद मिळकतीबाबत कोणत्याही कार्यालयात अथवा न्यायालयात दावा, वाद, खटला दाखल नाही. तसेच दस्तात नमुद मिळकतीबाबत कोणत्याही न्यायालयाकडून स्टे ऑर्डर किंवा मनाई हुकूम मिळालेला नाही. याबाबतची समज दस्तातील लिहून घेणार व लिहून देणार यांना आहे.

वरील संपुर्ण मजकुर आम्ही वाचला असून तो आम्हास मान्य व कबुल आहे.

JOINT SUB REGISTRAR CLASS-2

**लिहून देणार**

सि. बा. सपकाळे
----------

नथ्थु लक्ष्मण पाटील
----------

ताराबाई आसाराम महाजन
----------

----------

सौ मनिषा मुकेश मोरे

**लिहून घेणार**

----------

----------

सत.६६०५/२०२१
२२/३८

## : मुल्यांकन :

सदर भुविकास करारनाम्याबाबत नोंदणी व मुद्रांक विभागाचे सन २०२०-२१ करीता मार्गदर्शक सुचनेतील कलम ३२A नुसार बांधकाम क्षेत्र विभागणी प्रकरणी खालीलप्रमाणे मुल्यांकन केलेले आहे.

जमिनीचे दर : ५८२० (झोन नंबर ८/२४८)

(अ) **जमीन मालकास मिळणाऱ्या हिश्श्याचे मोबदल्याचे मुल्य :**

जमीन मालकाच्या हिश्याचे क्षेत्राचे बांधकाम दरानुसार येणारे मुल्य -

जमीन मालकास मिळणारा बांधीव हिस्सा

२७०.१६ चौ.मि. X रुपये २२,९९०/- [आर.सी.सी. बांधकामाचे दर] =

रूपये ६२,१०,९७८.४० + मोबदला रुपये १५,५२,०००/-

**एकूण = ७७,६२,९७८.४०/-**

**राऊंडअप = ७७,६३,०००.००/-**

(ब) **विकसन कर्त्याला मिळणाऱ्या हिश्याचे मुल्य**

(विकसन कर्त्याच्या हिश्याच्या बांधकाम क्षेत्र X स्थूल जमिनीसाठीची सुचना क्रमांक १६(ब) मधील कोष्टक विचारात घेऊन आलेला जमीनीच दर) - (टिडीआर मुल्य + प्रिमियम मुल्य इ.)

**१२७५.०७ चौ.मि.X रुपये ५८२०/- = ७४,२०,९०७.४/-**

**अ व ब पैकी जास्तीचे मुल्य म्हणजे अ चे मुल्य रुपये ७७,६३,०००/**

**मुद्रांक शुल्क ५%** : **रूपये ३,८८,२००/-**

**नोंदणी फी** : **रुपये ३०,०००/-**

बुधवार,27 ऑक्टोबर 2021 12:09 म.नं.

दस्त गोषवारा भाग-1

जलन2 3238
दस्त क्रमांक: 7605/2021

दस्त क्रमांक: जलन2 /7605/2021

बाजार मुल्य: रु. 77,63,000/- मोबदला: रु. 00/-

भरलेले मुद्रांक शुल्क: रु.3,88,200/-

दु. नि. सह. दु. नि. जलन2 यांचे कार्यालयात
अ. क्रं. 7605 वर दि.27-10-2021
रोजी 12:08 म.नं. वा. हजर केला.

पावती:9123 पावती दिनांक: 27/10/2021

सादरकरणाराचे नाव: सह्याद्री शिखर तर्फे भागीदार परशुराम एकनाथ पाटील

| | |
|---|---|
| नोंदणी फी | रु. 30000.00 |
| दस्त हाताळणी फी | रु. 680.00 |
| पृष्टांची संख्या: 34 | |
| एकुण: | 30680.00 |

दस्त हजर करणाऱ्याची सही:

प्र.सह दुय्यम निबंधक (वर्ग-२)
Sub Registrar Jalgaon 2
जळगाव-२

प्र.सह दुय्यम निबंधक (वर्ग-२)
Sub Registrar Jalgaon 2
जळगाव-२

दस्ताचा प्रकार: विकसनकरारनामा

मुद्रांक शुल्क: (दोन) कोणत्याही नगरपालिका किंवा नगर पंचायत किंवा स्थालगत असलेल्या कोणत्याही कटक क्षेत्राच्या हद्दीत किंवा मुंबई महानगर प्रदेश ॥विकास प्रा॥धिकरणाच्या हद्दीत असलेल्या कोणत्याही ग्रामीण क्षेत्रात, किंवा मुंबई मुद्रांक (मालमत्तेच्या प्रत्यक्ष बाजार मूल्याचे निधारण) नियम, 1995 अन्वये प्रकाशित झालेल्या वार्षिक विवरणपत्रातील दराप्रमाण् प्रभाव क्षेत्रात.

शिक्का क्रं. 1 27 / 10 / 2021 12 : 08 : 09 PM ची वेळ: (सादरीकरण)

शिक्का क्रं. 2 27 / 10 / 2021 12 : 09 : 35 PM ची वेळ: (फी)

THE SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR CLASS-2 * JALGAON-2 *

वरील दस्तऐवज करुन देणार तथाकथीन विकसनकरारनामा चा दस्त ऐवज करुन दिल्याचे कबुल करतात.
शिक्का क्र.3 ची वेळ:27 / 10 / 2021 12 : 58 : 23 PM

ओळख:-
खालील इसम असे निवेदीत करतात की ते दस्तऐवज करुन देणा-यानां व्यक्तीशः ओळखतात, व त्यांची ओळख पटवितात

| अनु क्र. | पक्षकाराचे नाव व पत्ता | | | छायाचित्र | अंगठ्याचा ठसा |
|---|---|---|---|---|---|
| 1 | नाव:हर्षल परशुराम वाघ<br>वय:30<br>पत्ता:रा. पोस्टल कॉलनी जळगाव<br>पिन कोड:425001 | [signature] | स्वाक्षरी |  |  |
| 2 | नाव:हरीश माणिकराव गुर्वे<br>वय:42<br>पत्ता:रा. कंडारी जळगाव<br>पिन कोड:425001 | Harish | स्वाक्षरी |  |  |

शिक्का क्र.4 ची वेळ:27 / 10 / 2021 12 : 59 : 28 PM

प्र सह दुय्यम निबंधक (वर्ग-२) जळगांव-२

Payment Details.

| sr. | Purchaser | Type | Verification no/Vendor | GRN/Licence | Amount | Used At | Deface Number | Deface Date |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | SAHYADRI SHIKHAR | eChallan | 02003942021102601143 | MH008029221202122E | 388200.00 | SD | 0003805093202122 | 27/10/2021 |
| 2 | SAHYADRI SHIKHAR | eChallan | | MH008029221202122E | 30000 | RF | 0003805093202122 | 27/10/2021 |
| 3 | | DHC | | 2610202108278 | 680 | RF | 2610202108278D | 27/10/2021 |

[SD:Stamp Duty] [RF:Registration Fee] [DHC: Document Handling Charges]

7605 /2021

Know Your Rights as Registrants

1. Verify Scanned Document for correctness through thumbnail (4 pages on a side) printout after scanning.
2. Get print immediately after registration.

For feedback, please write to us at feedback.isarita@gmail.com

ज ल न - २
दस्त.क्र ८०८४/२०२१
३४/३८

प्रमाणित करणेत येते की सदर
दस्तामध्ये एकूण ३८ पाने आहेत.
पुस्तक क्रमांक १
दस्त क्रमांक ८०८४ वर नोंदला.
ता २७/१०/२०२१

प्र सह दुय्यम निबंधक (वर्ग-२) जळगांव-२

THE SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR CLASS-2 JALGAON-2
सह दुय्यम निबंधक वर्ग-२ यांची मुद्रा जळगांव-२
सत्यमेव जयते